महाराष्ट्र शासन
GRANT GOVT. MEDICAL COLLEGE &
+ SIR J.J.GROUP OF HOSPITALS, MUMBAI +
(GOVERNMENT OF MAHARASHTRA)
ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, व सर ज.जी. समुह रुग्णालय, मुंबई ४००००८
Tel.No.373 55 55, 373 1144 ; Fax No.373 55 99; e-mail – gmcgss3@gmail.com

क्र.ग्रँशावैम/राजप/गट अ व ब/गोपनीय अहवाल/५३९८/२०२५, दिनांक :- ९ /१२/२०२५.

परिपत्रक

विषय :- वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई याच्या अधिनस्त गट अ व ब पदावरील अधिकारी व कर्मचारी याचे गोपनीय अहवालाबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्र. नस्ती क्र : MEDD-१२/११४/२०२५-MMD(Vais-२) ई-१३८७६९३

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील गट अ व गट ब वर्गातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांच्या गोपनीय अहवालांकरीता प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी हे घोषीत केले असून याद्वारे सर्व संबंधितांच्या निदर्शनास ही बाब आणून देण्यात येत आहे. शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

(डॉ.अजय भंडारवार)
अधिष्ठाता,
ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई

प्रती,
सर्व विभागातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक, ग्रँशावैम, मुंबई.

नकारात्मक

ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
मुंबई ४०० ००८
आवक क्र. M-88
दिनांक: 99/92/24

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील गट अ व गट ब वर्गातील विविध शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरील राजपत्रित अधिकारी यांचे गोपनीय अहवालाकरीता प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी घोषीत करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः नस्ती क्र .:MEDD-१२/११४/२०२५-MMD(Vais-२) ई-१३८७६९३**
**गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, ९ वा मजला लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई -४०० ००१**
दिनांक: २७ ऑक्टोबर २०२५

**वाचा**

१) शासन निर्णय सामान्य प्रशासान विभाग क्रमांक- सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दि.०१.११.२०११

२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.पदनि २४२० / प्र.क्र.१४५ /२०२०/वैसेवा-१, दि.०६.१०.२०२१

३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र. संवैशिवसं/गोपनीय /अहवाल/२७१/२०२३,दि.३१.०१.२०२३

४) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.२४ /२०२३/ वैसेवा-१, दि.१५.०२.२०२३

**प्रस्तावना**

सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.१ येथील दि.०१.११.२०२१ च्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमीत केल्या असून गोपनीय अहवाल लिहिणे व संबंधीतांना अवगत करणे याकरीता कालमर्यादा विहीत करुन दिलेली आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील गट अ व गट ब वर्गातील विविध शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरील राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने प्रस्तावित केल्यानुसार आयुक्त (वैद्यकीय शिक्षण ) व इतर अधिकारी यांना दि.१५.०२.२०२३ अन्वये प्रतिवेदन / पुनर्विलोकन अधिकारी घोषीत करण्यात आले होते. गोपनीय अहवालांचे संस्करण वेळीच होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच प्रशासकीय कारणास्तव त्यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

प्रस्तावनेत विशद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील गट अ व गट ब वर्गातील विविध शिक्षक व शिक्षकेत्तर पदांवरील राजपत्रित अधिकारी यांच्या गोपनीय अहवालांकरीता खालीलप्रमाणे प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिकारी घोषीत करण्यांत येत आहेत.

१९५
२८/१०/२५

| अ.क. | पदनाम | प्रतिवेदन अधिकारी | पुनर्विलोकन अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | संचालक | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) | सचिव / प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (वैद्यकीय शिक्षण) |
| २ | सह संचालक ( वैद्यकीय / दंत / प्रशासन ) | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) | सचिव / प्रधान सचिव/ अपर मुख्य सचिव (वैद्यकीय शिक्षण |

शासन निर्णय क्रमांकःनस्ती क्र .:MEDD-१२/११४/२०२५-MMD(Vais-२) ई- १३८७६९३

| अ.क. | पदनाम | प्रतिवेदन अधिकारी | पुनर्विलोकन अधिकारी |
|---|---|---|---|
| ३ | अधिष्ठाता (वैद्यकीय / दंत) | संचालक | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) |
| ४ | सुश्रुषा सेवा अधिक्षीका | सह संचालक (परीचर्या) | संचालक |
| ५ | प्राध्यापक (वैद्यकीय / दंत) | अधिष्ठाता | संचालक |
| ६ | सहयोगी प्राध्यापक (वैद्यकीय / दंत) | विभाग प्रमुख | अधिष्ठाता |
| ७ | सहायक प्राध्यापक (वैद्यकीय / दंत) | विभाग प्रमुख | अधिष्ठाता |
| ८ | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता | संचालक |
| ९ | वैद्यकीय उपअधिक्षक | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता |
| १० | वैद्यकीय अधिकारी | वैद्यकीय अधिक्षक | अधिष्ठाता |
| ११ | दंतशल्यचिकित्सक | विभागप्रमुख | अधिष्ठाता |
| १२ | मुख्य प्रशासकीय अधिकारी (संचालनालयाच्या आस्थापनेवरील ) | संचालक | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) |
| १३ | मुख्य प्रशासकीय अधिकारी (संचालनालय व्यतिरिक्त) | अधिष्ठाता | संचालक |
| १४ | प्रशासकीय अधिकारी (संचालनालयाच्या आस्थापनेवरील ) | सह संचालक (आस्थापना) | संचालक |
| १५ | प्रशासकीय अधिकारी (संचालनालय व्यतिरिक्त) | अधिष्ठाता | संचालक |
| १६ | सहायक संचालक (लेखा) | संचालक | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) |
| १७ | लेखा अधिकारी | सह संचालक (वैद्यकीय) | संचालक |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by
Shwetambari Pravin Khade
Date: 27-10-2025 15:53:28

(श्वेतांबरी खडे)
उपसचिव ,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई

प्रत,

१) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालये
२) निवडनस्ती वैसेवा -२